MHND100019222022

कौ.हिं.सं.अर्ज क्रं. ४६/२०२२
दिव्यांशा वि. पंकज व इतर

आदेश नि.क्रं ५३ वर
**(दिनांक २५ ऑक्टोबंर, २०२४)**

सदरचा अर्ज अर्जदारातर्फे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २१ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे पती-पत्नी असून त्यांच्यामध्ये अदयापपर्यंत घटस्फोट झालेला नाही. त्यांचा विवाह दिनांक २६.१२.२०१८ रोजी माहेश्वरी मंगल कार्यालय, नांदेड येथे संपन्न झाला असून दिनांक १.२.२०२० रोजी त्यांना मुलगा नामे रेयांश जन्मला. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदाराने अर्जदाराचे बाळ हिसकावून घेवून तिला दिनांक ६.८.२०२२ रोजी औरंगाबाद येथील घरातून हाकलून दिले आहे. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी बारूळ येथे राहत आहे. गैरअर्जदार क्र १ व त्याचे कुटुंबातील व्यक्तीने अर्जदाराला तिच्या मुलास भेटू दिलेले नाहीत त्यामुळे मागिल दोन ते तिन वर्षापासून अर्जदार तिच्या मुलाला भेटलेली नाही

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार ही मुलगा रेयांश यांची जन्मदाती व नैसर्गिक पालक असून सुध्दा तिच्या मुलास भेटू न देण्यासाठी गैरअर्जदार हे वेगवेग्ळे प्रयत्न करत आहेत. यापुर्वीसुध्दा याच न्यायालयाने अर्जदाराचा मुलाचा जनमदिवस साजरा करण्यासाठी मुलाचा तात्पुरता ताबा अर्जदारास देण्याचे आदेशीत केले होते परंतू गैरअर्जदाराने न्यायालयाच्या आदेशाचे पालन केलेले नाही. मुलगा रेयांश याला जवळ ठेवण्याची जेवढी ईच्छा गैरअर्जदाराची आहे तेवढीच ईच्छा अर्जदाराची सुध्दा आहे. त्यामुळे दि. २३-१०-२०२४ पासून हिंदू धर्मातील अंत्यत महत्वाचा दिवाळी हा सण साजरा करण्यात येणार आहे अर्जदारास तिला तिच्या मुला सोबत साजरा करायचा आहे. त्यामुळे दिवाळी हा सण साजरा करण्यासाठी अर्जदाराचा मुलगा रेयांश यास गैरअर्जदाराने अर्जदाराच्या ताब्यात दयावे असा आदेश करणे न्यायाचे आहे. तसेच अर्जदारने मागील ब-याच वर्षापासुन मुलाला पाहिलेले नसल्यामुळे अर्जदाराला तिचा मुलगा रेयांश याला मोबाईल व्दारे व्हीडीओ कॉलवर बोलण्यासाठी व त्याला पाहण्यासाठी गैरअर्जदार क्र १ ला आदेशीत करण्याची विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे म्हणणे निशाणी क्र.५६ वर दाखल करून

अर्जदाराच्या अर्जातील कथन नाकारले आहे. गैरअर्जदाराने असे कथन केले की, गैरअर्जदाराने अर्जदाराचे बाळ हिसकावून घेतलेले नाही तसेच अर्जदारास तिच्या सासरच्यांनी हाकलून दिलेले नाही. पुढे असे कथन केले की, दिवाळी दरवर्षीच येते. गेल्या तीन वर्षाच्या दिवळीत अर्जदाराने मुलाच्या ताब्यासाठी हटट धरलेला नव्हता आणि नाही. या दिवाळीचे काय वैशिष्ठ आहे हे अर्जदारच जाणो. परंतू गैरअर्जदाच्या मते अज्ञात बालक , त्याचा पिता आणि त्याच्या घरातील सर्व मंडळीच्या दिवाळी सणाला गालबोट कसे लावता येईल, यासाठी हा अर्ज केलेला आहे. अर्जदाराने आनंदाने दिवाळी साजरी करायची आणि सासरच्याना मात्र वेठिस धरायचे, असा दिवाळी साजरा करण्याचा मानस असू शकत नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी गैरअर्जदाराने विनंती केली.

५. अर्जदारच्या वतीने विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार तसेच त्याच्या विधिज्ञाचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.

## कारणमिमांसा

६. अर्जदाराने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २१ अंतर्गत दाखल केला आहे. सदर कायदा हा महिलांवर कुटूंबात होणा-या कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांच्या अधिकाराचे संरक्षण प्रदान करणारा कायदा आहे. अर्जदाराने असे कथन केले की, गैरअर्जदाराने अर्जदारास तिच्या जवळचे बाळ हिसकावून घेवून तिला औरंगाबाद येथील घरातून हाकलून दिले आहे. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी बारूळ येथे राहत आहे व तेव्हापासून ती तिच्या मुलाला भेटलेली नाही. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ विरूदध मा.जिल्हा न्यायालय, कंधार येथे मुलगा रेयांश याला अर्जदाराच्या ताब्यात मिळणेबाबतचा अर्ज केला होता. सदरील प्रकरणात मा.जिल्हा न्यायाधीश यांनी मुलगा रेयांशचा तात्पुरता/अंतरिम ताबा मंजूर केलेला आहे. त्यानुसार अर्जदाराच्या मुलाचा ताबा एक महिना अर्जदाराकडे ठेवण्यासाठी व महिना पूर्ण झाल्यानंतर पुढील महिना गैरअर्जदाराकडे मुलाचा ताबा राहिल असा आदेश केला. परंतू गैरअर्जदाराने त्या आदेशाचे पालन केलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदार विरूध्द न्यायालयाचा अवमान केल्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ ने आजपर्यंत मा. न्यायालयाने दिलेल्या तारखेवर मुलगा रेयांश याला कधीही सोबत आणलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने तिचा मुलगा रेयांशला मागील दोन ते तीन वर्षापासून पाहिलेले नाही. अर्जदार ही आई असल्यामुळे मुलगा रेयांश याला जवळ ठेवण्याची जेवढी ईच्छा गैरअर्जदाराची आहे तेवढीच ईच्छा अर्जदाराची सुध्दा आहे. तसेच दि. २३-१०-२०२४ पासून हिंदू धर्मातील अंत्यत महत्वाचा दिवाळी हा सण साजरा करण्यात येणार आहे. दिवाळी हा सण

अर्जदारास तिला तिच्या मुला सोबत साजरा करायचा आहे. त्यामुळे दिवाळी हा सण साजरा करण्यासाठी अर्जदाराचा मुलगा रेयांश यास गैरअर्जदाराने अर्जदाराच्या ताब्यात दयावे असा आदेश करणे न्यायाचे आहे. तसेच अर्जदाराने मागील ब-याच वर्षापासुन मुलाला पाहिलेले नसल्यामुळे अर्जदाराला तिचा मुलगा रेयांश याला मोबाईल व्दारे व्हीडीओ कॉलवर बोलण्यासाठी व त्याला पाहण्यासाठी गैरअर्जदार क्र १ ला आदेशीत करण्याची विनंती केली आहे.

७. याउलट गैरअर्जदाराने असे कथन केले की, गैरअर्जदाराने अर्जदाराचे बाळ हिसकावून घेतलेले नाही. अर्जदार ही स्वेइच्छेने कोणालाही न सांगता गुपचूप माहेरी पळून गेली. अर्जदारास तिच्या सासरच्यांनी हाकलून दिलेले नाही. अर्जदाराने मुलास व्हीडीओ कॉलवर बोलण्यासाठी गैरअर्जदाराचा अक्षेप नाही. परंतू गैरअर्जदास सदर व्हीडीओ कॉलची रेकॉर्डीग करण्याची मुभा मिळावी. तसेच झालेले बोलणे पुरावा म्हणुन कोणालाही वापरता येणार नाही असे कथन केले. तसेच गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले की, दिवाळी दरवर्षीच येते. गेल्या तीन वर्षाच्या दिवळीत अर्जदाराने मुलाच्या ताब्यासाठी हटट धरलेला नव्हता आणि नाही. या दिवाळीचे काय वैशिष्ठ आहे हे अर्जदारच जाणो. परंतू गैरअर्जदाच्या मते अज्ञात बालक , त्याचा पिता आणि त्याच्या घरातील सर्व मंडळीच्या दिवाळी सणाला गालबोट कसे लावता येईल, यासाठी हा अर्ज केलेला आहे. अर्जदाराने आनंदाने दिवाळी साजरी करायची आणि सासरच्याना मात्र वेठिस धरायचे, असा दिवाळी साजरा करण्याचा मानस असू शकत नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी गैरअर्जदाराने विनंती केली.

८. प्रस्तुत अर्जाचे तसेच गैरअर्जदाराच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार हे आपसात पती-पत्नी असून त्यांच्या वैवाहिक जीवनातून मुलगा रेयांश जन्मला आहे व तो सध्या गैरअर्जदाराकडे आहे. अर्जदार ही मुलगा रेयांश याची नैसर्गिक पालक असून तिला तिच्या मुलाला भेटण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने दिनांक २०.१.२०२४ रोजी निशाणी क्र.३४ खाली अर्ज दाखल केला होता त्यामध्ये तिने तिच्या मुलास अडीच वर्षापासून पाहिले नसल्यामुळे तसेच तिच्या मुलाचा जन्म १.२.२०२० रोजी झाला असून त्याचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी दिनांक २५.१.२०२४ ते २.२.२०२४ पर्यंत मुलाचा ताबा देण्याबाबत अर्ज केला होता. सदरचा अर्ज अंशत: मंजूर करून गैरअर्जदार क्र.१ ला निर्देशीत करण्यात आले होते की, त्याने दिनांक १.२.२०२४ रोजी दुपारी १२.०० ते ४.०० पर्यंत मुलाचा ताबा अर्जदारास देवून जन्मदिवस साजरा करावा व त्यानंतर अर्जदाराने मुलास

गैरअर्जदाराच्या ताब्यात दयावे. परंतू गैरअर्जदाराने निशाणी क्र.४३ वर पुरसीस दाखल करून औरंगाबाद ते कंधार तिकीट न मिळाल्याचे कारण सांगून सदरच्या आदेशाचे पालन केले नाही.

९. त्यानंतर गैरअर्जदाराने दिनांक १.२.२०२४ रोजी मुलाला हजर न केल्यामुळे अर्जदारने मुलगा रेयांशचा वाढदिवस दोन दिवसानंतर साजरा करण्यासाठी गैरअर्जदाराने मुलास कंधार येथे घेवून येण्यासाठी निशाणी क्र.४४ वर अर्ज दाखल केला. सदर अर्जावर गैरअर्जदाराने निशाणी क्र.४५ नुसार म्हणणे दाखल केले व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

१०. यानंतर दिनांक ९.२.२०२४ रोजी निशाणी क्र.४४ वर आदेश पारीत करून गैरअर्जदारास निशाणी क्र.३४ वरील आदेशाची दिनांक १७.२.२०२४ रोजी पूर्तता करणेकामी आदेशीत करण्यात आले. परंतू गैरअर्जदार क्र.१ ने निशाणी क्र.४६ वर अर्ज दाखल केला व मुलाच्या आजारपणाचे कारण दर्शवून दिनांक ९.२.२०२४ च्या आदेशाची पूर्तता केली नाही. याउलट गैरअर्जदाराने अर्जदार हिने औरंगाबाद येथे येवून तेथील न्यायालयात येवून वाढदिवस साजरा करावा, असा आदेश देण्याची विनंती केली. गैरअर्जदाराचा सदर अर्ज नामंजूर करण्यात आला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने निशाणी क्र.४७ खाली अर्ज दाखल करून मुलास अर्जदाराच्या भेटीसाठी पुढील तारीख मिळणेबाबत अर्ज दाखल केला. सदर अर्जावर दिनांक ११.३.२०२४ रोजी आदेश पारित करून गैरअर्जदारास मुलगा रेयांश याला दिनांक १८.३.२०२४ रोजी सदर न्यायालयात घेवून येण्याबाबत आदेशीत केले, परंतू गैरअर्जदाराने या ही आदेशाची पुर्तता केलेली दिसून येत नाही. तसेच अर्जदाराने नि.क्र ३६ प्रमाणे अर्जदारास तिच्या मुलाचा सहवास मिळण्यासाठी गैरअर्जदाराने मुलगा रेयांश याला प्रस्तूत प्रकरणाच्या प्रत्येक तारखेस हजर ठेवण्यासाठी अर्ज दाखल केला होता सदरचा अर्ज दि. ३१-०८-२०२४ रोजी मंजुर करण्यात आला. परंतु गैरअर्जदाराने मुलगा रेयांश याला प्रस्तूत प्रकरणाच्या तारखेवर हजर ठेवलेले नाही.

११. गैरअर्जदाराचे वर्तन पाहिले असता गैरअर्जदार न्यायालयाच्या आदेशांचे पालन करीत नसल्याचे दिसून येते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ हा कायदा महिलांवर कुटूंबात होणा-या कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांच्या अधिकाराचे संरक्षण प्रदान करणारा कायदा आहे. सदर कायदा हा कौटूंबिक नातेसंबंध आणि कूटूंबाची संस्था वाढविण्याच्या उददेशाने लागू केलेला एक विशेष कायदा आहे. मुलाच्या चांगल्या संगोपनासाठी त्याचे आई-वडील या दोघांचे प्रेम व आपूलकीची गरज असते. तसेच मुलाच्या योग्य विकासासाठी दोन्ही पालकांची गरज मुलाला असते. अर्जदारास तिच्या मुलाला भेटू न देण्याचा किंवा भेट होवू न देण्याचा गैरअर्जदाराचा प्रयत्न हा देखील एक

प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराच आहे. या कृतीद्वारे गैरअर्जदार अर्जदारास तिचा मातृत्व हक्कापासून वंचीत करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराचे सदरचे हे वर्तन अर्जदारावर अन्यायकारक असल्याचे निदर्शनास येते. दिवाळी हा सण हिंदू धर्मातील महत्वाचा सण असून अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांच्या मुला सोबत सदरचा सण साजरा करण्याचा समान हक्क आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून अर्जदारास तिच्या मुलाला दिवाळी सणा निमीत्य भेटण्याचा अर्ज अंशत: मंजूर करणे न्यायोचीत आहे. तसेच गैरअर्जदार याने अर्जदारास तिच्या मुलाला व्हीडीओ कॉल वर बोलण्यासाठी व पाहण्यासाठी कसल्याही प्रकारे अडथळा करू नये असे गैरअर्जदारास निर्देशीत करणे न्यायोचित आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो -

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र.५३ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र १ ला निर्देशीत करण्यात येते की, त्याने मुलगा रेयांश याला दि. ३०-१०-२०२४ ते ०४-११-२०२४ पर्यंत दिवाळी सण साजरा करण्यासाठी अर्जदाराच्या ताब्यात दयावे. तसेच अर्जदारास तिच्या मुलास व्हीडीओ कॉल व्दारे बोलण्यासाठी कोणताही अडथळा करू नये.

दि. २५.१०.२०२४

स्वा/-
(श्रीमती म.बा.साखरे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कंधार